Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 17 March 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १७ मार्च २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्ली इथं रायसीना संवाद २०२५ चं उद्घाटन करणार आहेत. या संवादाचं हे दहावं वर्ष आहे. न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लक्झन हे या संवादाच्या उद्घाटनाच्या सत्राला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील आणि उपस्थितांशी संवाद साधतील. याशिवाय, पाच दिवसांच्या दौऱ्यादरम्यान ते मुंबईलाही भेट देणार आहेत.

यंदा रायसीना संवादाची मध्यवर्ती संकल्पना 'कालचक्र – नागरिक, शांतता आणि पृथ्वी' अशी आहे. १९ तारखेपर्यंत चालणाऱ्या या कार्यक्रमात १२५ देशांमधून विविध क्षेत्रांमधले आघाडीचे नागरिक सहभागी होणार आहेत. यासाठी विविध देशांचे प्रतिनिधी नवी दिल्लीला पोहोचत आहेत.

****

आयएनएस गुलदार ही सेवानिवृत्त युद्धनौका कारवार इथल्या नौदलाच्या तळावरून सिंधुदुर्ग जिल्ह्यात विजयदुर्ग बंदरात येऊन स्थिरावली आहे. आयएनएस गुलदार युद्धनौका युद्धात, शांततेच्या काळात आपदग्रस्तांना मदतीसाठी वापरण्यात येत होती. ही नौका आता पर्यटकांच्या आणि अभ्यासकांच्या सेवेत रुजू होत असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

नवी मुंबईतल्या नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन लांबणीवर पडलं आहे. अदानी उद्योग समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी काल या विमानतळाच्या बांधकामाला भेट दिली आणि येत्या जूनमधे त्याचं उद्घाटन होईल असं समाजमाध्यमावर सांगितलं. या आधी येत्या १७ एप्रिलपर्यंत या विमानतळाचं उद्घाटन होईल, असं अदानी समूहातर्फे सांगण्यात आलं होतं. अदानी उद्योगसमूह

आणि सिडकोच्या भागीदारीतून उभारण्यात येणाऱ्या या विमानतळाची क्षमता एका वर्षात ९ कोटी प्रवाशांची ये-जा हाताळण्याची असेल.

****

तिथीनुसार शिवजयंती आज राज्यात ठीकठिकाणी साजरी करण्यात येत आहे. या निमित्तानं शिवनेरीसह विविध गड किल्ल्यांवर शिवभक्तांकडून अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांचा इतिहास देदीप्यमान असून, सातारा जिल्ह्यात फलटण इथल्या मुरूम गावात त्यांच्या जन्मस्थळाच्या विकासासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी दिली. सातारा जिल्हा परिषद आणि मुरूम ग्रामपंचायतीच्या वतीनं श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांची ३३२वी जयंती काल साजरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते

****

फळपिकांना विमा संरक्षण देण्यासाठी राज्यातल्या २४ जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांच्या ७३ हजार ६८६ अर्जांपैकी १६ हजार ६२० अर्ज अपात्र ठरले आहेत. प्रत्यक्ष फळबाग लागवड नसणं, उत्पादनक्षम बाग नसताना विमा संरक्षण घेणं यासारख्या बाबी पुणे कृषी विभागाने केलेल्या पडताळणीनंतर स्पष्ट झाल्या. अपात्र अर्जांद्वारे नऊ हजार ६५२ हेक्टर क्षेत्रावर बनावट फळपीक विमा काढण्यात आला होता. या अपात्र अर्जांमध्ये सर्वाधिक सात हजार ३३४ अर्ज जालना जिल्ह्यातले आहेत.

****

महिला स्वयंसहाय्यता बचत गटांच्या वस्तुंचं आणि ग्रामीण भागातल्या शेतकरी उत्पादनांच्या विभागस्तरीय प्रदर्शन आणि विक्री महोत्सवाचं म्हणजे दख्खन जत्रा २०२५चं उद्घाटन काल सांगलीत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झालं. या जत्रेच्या माध्यमातून बचत गटांतल्या महिलांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळाल्यानं महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यास प्रोत्साहन मिळेल असं, पाटील यावेळी म्हणाले.

****

वाशीम इथं दोन दिवसीय राज्यस्तरीय दिव्यांग कला महोत्सवाचं उद्घाटन काल जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांच्या हस्ते झालं. यामध्ये राज्यभरातून विविध जिल्ह्यांमधून दिव्यांग, मतिमंद बांधव कलाकारांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. उद्घॉन सत्रात दिव्यांग कलाकारांनी मोठ्या उत्साहाने पारंपारिक लोकनृत्य, वेशभूषा,

नाटिका, गोंधळ, भारुड, ड्रम शो चं सादरीकरण केलं, आणि अपंग दिव्यांग बांधवांनी आपल्या हस्तकलेतून बनवलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भरवण्यात आलं होतं.

****

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात उद्या मंगळवारी मेगा जॉब फेअर होणार आहे. विद्यापीठातल्या नायलेट इथं छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि मुंबई इथल्या नामांकित कंपन्या या जॉब फेअर मध्ये सहभागी झाल्या असून, विविध पदविका, पदवी तसंच पदव्यूत्तर शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरता नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

****

दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाअंतर्गत पीट लाईन क्रमांक-दोनच्या विस्तारीकरणाच्या कामासाठी ३१ मार्चपर्यंत पंधरा दिवसांसाठी मंजुरी देण्यात आली आहे. या कामामुळे काही रेल्वे ठराविक तारखांना रद्द राहणार आहेत. यामध्ये परभणी-नांदेड एक्स्प्रेस ही १९ ते २३ तसंच २६, २७, २९ आणि ३० मार्च रोजी, तर नांदेड-औरंगाबाद एक्स्प्रेस २१ आणि २८ मार्च रोजी रद्द करण्यात आली आहे.

****

येत्या दोन दिवसात विदर्भ, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, उत्तर तेलंगणा, पश्चिम बंगाल, सौराष्ट्र तसंच कच्छ या भागांत उष्णतेची लाट येण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. पुढचे दोन दिवस झारखंड आणि पश्चिम बंगालला यलो अलर्ट देण्यात आहे.

****